# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र. कोविमं/ए-२/ १२ वी गोप./प्रात्य./तोंडी/ 760
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक: 08 /०६/२०२४.

प्रति,
प्राचार्य,
कोल्हापूर विभागीय मंडळ कक्षेतील,
सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा, सांगली, कोल्हापूर.

**विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी ) पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२४ च्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रकाबाबत......**

संदर्भ :- १ .राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/५५०८, दिनांक २६.१२.२०२३ चे पत्र.
२.राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-६/२१२८, दिनांक ०३.०६.२०२४ चे पत्र.
३.कार्यालयीन टिप्पणी मंजूरीचा दिनांक -०६-२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) जुलै / ऑगस्ट २०२४ परीक्षेच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा खाली नमूद केलेल्या कालावधीत घेण्यात येत आहेत.

| अ.क्र. | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| ०१ | प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार दिनांक १६ जुलै,२०२४ ते शनिवार दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४ |
| ०२ | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | |
| ०३ | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी ) सर्वसाधारण व द्विलक्षी विषय व ऑनलाईन परीक्षा | मंगळवार दिनांक १६ जुलै,२०२४ ते गुरुवार दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ |
| ०४ | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा(इ.१२ वी ) व्यावसायिक विषय | मंगळवार दिनांक १६ जुलै,२०२४ ते ते शनिवार दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४ |
| ०५ | I.T. विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा | बुधवार दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४ व गुरुवार दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ |
| ०६ | G.K. विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा | |

**परीक्षेसंदर्भात महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे-**

१. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी ) पुरवणी परीक्षेच्या प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार केंद्रावर घेतली जात होती. तथापि त्यामध्ये बदल करण्यात येवून **इ. १२ वी ची प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा देखील संबंधीत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये घेण्यात यावी**. याबाबत संदर्भ- पत्र क्र.रा.मं./परीक्षा-२/५५०८, दिनांक २६.१२.२०२३ नुसार सर्वाना कळविण्यात आलेले आहे.

२. प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाचे परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४ परीक्षेप्रमाणेच OMR Sheet ऐवजी PORTAL वर ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत. याबाबतची LINK आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

३. **परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा आणि अंतर्गत मूल्यमापन परीक्षा OUT OF TURN ने आयोजित करण्यात येणार नाही.** तरी विद्यार्थी संख्येनुसार शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक, तोंडी व श्रेणी परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांचा परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपूर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी मिळेल याची दक्षता शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी.

४. इ.१२ वी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षक म्हणून ज्या त्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.

५. इ.१२ वी माहिती तंत्रज्ञान (IT) व सामान्यज्ञान (GK) या विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने बुधवार दिनांक ०७ ऑगस्ट, २०२४ व गुरुवार दिनांक ०८ ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्यात येणार आहे.सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा क.महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेता एकाच वेळी घेणे शक्य नसल्याने ती गटागटामध्ये घेण्यात येईल.क. महाविद्यालयांना संगणक प्रयोगशाळेच्या क्षमतेप्रमाणे विद्यार्थ्यांचे गट करुन,त्याप्रमाणे क. महाविद्यालयांनी परीक्षेचा दिनांक व वेळ संबंधित विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी याची माहिती परीक्षेपूर्वी करुन द्यावी.

**(सुभाष रा.चौगुले),**
**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**